॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२३–२४/५२९ दिनांक : १९/०१/२०२४

## परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,**
**रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

विषय: रस्ता सुरक्षा कक्षांतर्गत मार्गदर्शन करणे बाबत.

संदर्भ: मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड यांचे जा.क्र.६५६३/रसुक/प्रापका/नांदेड/२०२३, दिनांक २१ डिसेंबर २०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७/१०/२०२२ रोजी सुरक्षा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०२३–२४ या शैक्षणिक कालावधीमध्ये रस्ता सुरक्षा कक्ष अंतर्गत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयात या विभागामार्फत रस्ता सुरक्षा विषयक मार्गदर्शन करण्याचे नियोजन करणेकामी तसेच अपघातमुक्त संकल्पना राबविण्यासाठी खालील योजना राबविण्याचे निर्धारित करण्यात आलेले असल्याबाबत कळविले आहे.

१) विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना रस्ता सुरक्षा विषयक मार्गदर्शन करणे.
२) फेसलेस शिकाऊ अनुज्ञाप्ती बाबत मार्गदर्शन करणे.
३) विद्यापीठ संलग्नित नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्हयातील ३५७ महाविद्यालयात विद्यार्थी व प्राध्यापक कर्मचारी यांना विविध रस्ता सुरक्षा बाबत मार्गदर्शन करणे.
४) विद्यार्थ्यांद्वारे पथनाटय, गीत, घोषवाक्य याची रचना करून त्यांना विविध महाविद्यालय, शाळा ग्रामीण भागात जनतेला रस्ता सुरक्षा विषयावर प्रबोधन करणे.
५) महाविद्यालयात वाहन उत्पादक यांच्या मार्फत वाहन चालविण्यासाठी असणारे सुरक्षा बाबत प्रात्यक्षिक आयोजित करणे.
६) हेल्मेट व सीट बेल्ट सक्ती अश्या योजना राबवून विद्यार्थी दशे पासून रस्ता नियमांचे बाळकडू देणे
७) विद्यार्थी व विद्यार्थी गट यांच्या मदतीने विविध माहिती संकलीत करून त्याद्वारे विविध उपक्रम व भविष्यातील बदलाबाबत योजना राबविणे.
८) चित्रकला स्पर्धा, नाटय स्पर्धा, अभियांत्रिकी नाविन्यपूर्ण बदल यांची स्पर्धा आयोजित करून त्यातील उत्कृष्ट उपक्रमाची निवड करून राज्य व राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा राबविणे.
९) पक्की अनुज्ञप्ती चाचणी शिबीर आयोजित करणे.
१०) शालेय शिक्षण विभाग व इतर स्वंयसेवी संस्था यांना प्रशिक्षण देणे.
११) महाविद्यालयीन अभ्यासक्रमात वाहतूक नियम व वाहतूक चिन्ह यांचा समावेश करणे.
१२) सिम्युलेटर प्रशिक्षण
१३) वैद्यकीय मदत
१४) अवयव दान.

–२–

उपरोक्त सर्व संकल्पना राबविणे व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना वाहतूक नियमाबाबत जागृती करण्यासाठी शैक्षणिक सत्र सन २०२३—२४ चे वार्षिक नियोजन करण्यासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चारही जिल्हयात परिवहन विभागामार्फत प्रत्येक जिल्हयासाठी खालील प्रमाणे नोडल अधिका—यांची नियुक्ती केली आहे.

| अ.क्र | नोडल अधिका—यांचे नाव | मोबाईल क्रमांक | जिल्हा |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती रेणुका राठोड, मोवानि | ९८२२४३३५९३ | नांदेड |
| ०२ | श्री सुनिल जारवाल, समोवानि | ७३९१०१२५१९ | नांदेड |
| ०३ | श्री स्वप्नील राजूरकर, समोवानि | ७५८८०८१३८३ | लातूर |
| ०४ | श्री जयंत अंकमवार, समोवानि | ९०४९१४०५०३ | परभणी |
| ०५ | श्री कृष्णा मोहकरे, समोवानि | ८०८७२१७१२१ | हिंगोली. |

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात रस्ता सुरक्षा विषयक मार्गदर्शन करण्याचे नियोजन करणेकामी तसेच अपघातमुक्त संकल्पना राबविण्यासाठी उपरोक्त योजना राबविण्याबाबत उपराक्तपणे नमुद करण्यात आलेल्या आपल्या जिल्हयातील नोडल अधिका—यांशी सपर्क करून शैक्षणिक सत्र २०२३—२४ साठी वार्षिक नियोजन तयार करण्यात यावे, ही विनंती.

**डॉ.मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.